# शिंदेंकडून काँग्रेस, ठाकरेंना मोठा धक्का; असंख्य पदाधिकाऱ्यांचा शिवसेवेत प्रवेश

ePaper

| वर्ष - 9 | अंक -108 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 12 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत

- अर्शदीप हे काय करून बसला!
- क्विंटन डी कॉकचे वादळी अर्धशतक!
- २०२९ मध्ये मोठी राजकीय लढत?
- स्टंट करणाऱ्याच्या याचिका बंद



ePaper
# शिंदेंकडून काँग्रेस, ठाकरेंना मोठा धक्का; असंख्य पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

| वर्ष - 9 | अंक -108 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

आतील पानांत
- अर्शदीप हे काय करून बसला!
- क्विंटन डी कॉकचे वादळी अर्धशतक!
- २०२९ मध्ये मोठी राजकीय लढत?
- स्टंट करणाऱ्याच्या याचिका बंद

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 12 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## पुनर्विकासासाठी स्वतंत्र नियमावली: भाडेकरू–मालकांचे हक्क सुरक्षित : शिंदे

# मुंबई ‘पागडीमुक्त’च्या दिशेने मोठी झेप!

## १९ हजारांहून अधिक पागडी इमारतींच्या समस्यांवर ऐतिहासिक निर्णय

| मुंबई/नागपूर |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**मुंबईतील पागडी इमारतींचा प्रश्न अनेक दशकांपासून प्रलंबित असताना अखेर या समस्येच्या मूळावरच वार करणारा क्रांतिकारी निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. “मुंबई पागडीमुक्त करण्याचा निर्धार केला असून यासाठी स्वतंत्र नियमावली लागू करण्यात येणार आहे. भाडेकरू व घरमालक दोघांचेही हक्क अबाधित राहतील,” अशी ऐतिहासिक घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी विधानसभेत निवेदनाद्वारे केली.**



### राज्य सरकारच्या तीन मोठ्या घोषणा—

मुंबई पागडीमुक्तकरण्याची नियमावली, ओसी नसलेल्या इमारतींसाठी सुधारित अभय योजना, गिरणी जमिनीवरील चाळींच्या विकासातील सुधारणां—यामुळे मुंबईच्या शहरी विकासाला ऐतिहासिक गती मिळणार आहे. जर्जर इमारती, प्रलंबित खटले, पुनर्विकासातील अडथळे आणि शेकडो कुटुंबांचे असुरक्षित जीवन यावर आता निर्णायक प्रगती होईल, अशी शहरवासीयांची अपेक्षा आहे.

मुंबईतील १९६० पूर्वीच्या १९ हजारांहून अधिक सेस इमारती पागडी इमारतीं म्हणून ओळखल्या जातात. त्यापैकी मोठ्या प्रमाणावर इमारती जर्जर स्थितीत आहेत; अनेकांची स्थिती धोकादायक असून काही इमारती तर कोसळून जीवितहानीही झाली आहे. एकूण १३ हजारांपेक्षा जास्त इमारती पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत आहेत.

शिंदे म्हणाले, “या इमारतींतील भाडेकरूंना महाराष्ट्र रेंट कंट्रोल ॲक्टनुसार संरक्षण आहे; मालकांचेही कायदेशीर हक्क आहेत. पण पुनर्वसन हक्कांमुळे मालकीहक्काचा योग्य मोबदला मिळत नसल्याची तक्रार वर्षानुवर्षे कायम आहे. त्यामुळे भाडेकरू आणि मालकांमध्ये हजारो खटले सुरू आहेत. या सगळ्यामुळे पुनर्विकासाला अत्यल्प प्रतिसाद आहे. आता या सगळ्या गुंतागुंतीला पूर्णविराम मिळणार आहे.”

**भाडेकरू–मालकांचे हक्क अबाधित ठेवूनच नवीन मार्गदर्शक तत्त्वे**

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्टपणे सांगितले की पागडी इमारतींचे सुयोग्य, न्याय्य आणि पारदर्शक पुनर्विकास ही काळाची गरज आहे. “एफएसआय देऊन पुनर्विकास होईलच असे नाही. विशेषतः EWS आणि LIG कुटुंबांसाठी घरांची विनाशुल्क पुनर्बांधणी सुनिश्चित करणे सरकारची जबाबदारी आहे,” असे ते म्हणाले.

- **१३ हजार इमारतींच्या पुनर्विकासाला गती; जलदगती**
- **न्यायालयांचीही घोषणा; मुंबई पागडीमुक्त होणार**
- **पागडी इमारतींसाठी स्वतंत्र नियमावली**
- **भाडेकरू–मालकांचे हक्क अबाधित**
- **पुनर्विकासाला मोठा वेग**
- **२८ हजार खटल्यांसाठी जलदगती न्यायालये**
- **२० हजार ओसी नसलेल्या इमारतींना अभय योजना**
- **गिरणी जमिनीवरील चाळींच्या विकासाला चालना**

**मालकांना भूखंडाच्या मालकीपोटी बेसिक एफएसआय मिळणार**

पुनर्विकासासाठी लागणारा इन्सेंटिव्ह एफएसआय विनाशुल्क पुनर्बांधणीसाठी वापरला जाणार
उंची मर्यादा किंवा इतर मुद्द्यांमुळे एफएसआय कमी पडल्यास टीडीआर स्वरूपात भरपाई

या नियमांमुळे पुनर्विकास प्रक्रिया आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य बनेल, असे शिंदे यांनी ठामपणे सांगितले.

**28 हजार खटल्यांसाठी जलदगती न्यायालये — तीन वर्षांत सर्व निकाल**

पागडी तत्त्वावर राहणाऱ्या लाखो मुंबईकरांचा सर्वात मोठा अडथळा म्हणजे २८ हजारांहून अधिक प्रलंबित खटले. हे खटले निकाली निघाल्याशिवाय पुनर्विकासाला गती मिळणे शक्य नाही.

**त्यासाठी शिंदे यांनी महत्त्वाची घोषणा केली—**

उच्च न्यायालयाच्या परवानगीने अतिरिक्त जलदगती न्यायालये स्थापन केली जातील
पुढील तीन वर्षांत सर्व खटले निकाली काढण्याचे लक्ष्य.

“भाडेकरू किंवा मालकांवर कुठलाही अन्याय होणार नाही. दोघांचाही हक्क सुरक्षित ठेवून हा निर्णय घेतलेला आहे,” असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

**मुंबई पागडीमुक्त — लाखो नागरिकांना दिलासा**

या निर्णयामुळे— पागडी तत्त्वावर राहणाऱ्या लाखो मुंबईकरांना स्वतःच्या घराचा कायदेशीर हक्क मिळेल. पडझडीच्या भीतीत राहणाऱ्या कुटुंबांचे जीवन सुरक्षित होईल जर्जर इमारतींच्या समस्येचा कायमस्वरूपी शास्त्रीय तोडगा मिळेल. बांधकाम विभागावर प्रलंबित फाइल्सचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. “मुंबई आपल्या सर्वांची आन-बाण-शान आहे. तिच्या सुरक्षेसाठी आणि भविष्यासाठी ही योजना वरदान ठरेल,” असे शिंदे यांनी निवेदन समाप्त करताना सांगितले..

मुंबईतील २० हजारांहून अधिक इमारतींमध्ये वर्षानुवर्षे ऑक्युपन्सी सर्टिफिकेट (OC) नसल्याने नागरिकांना दुप्पट कर, पाणीपट्टी, मलनिस्सारण शुल्क अशा आर्थिक भुर्दंडाचा सामना करावा लागत होता.

रुग्ण सेवेचा बोजवारा

## वैद्यकीय यंत्रणेतील ‘अहरण अधिकारी’ वर्गाची

# रुग्ण कर्तव्याकडे डोळेझाक!

### पगार क्लासवनचा काम मात्र मुख्यलिपीकाचे,रुग्णांची होतेय हेळसांड ?

। पिंपरी-चिंचवड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील वैद्यकीय व्यवस्था ही नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. महापालिका रुग्णालये, विभागीय रुग्णालये यामध्ये डॉक्टर हे सर्वात महत्त्वाचे घटक. मात्र सध्या वायसीएमसह अनेक रुग्णालयांमध्ये डॉक्टर आपापल्या मूळ वैद्यकीय पदाप्रमाणे काम न करता प्रशासकीय खुर्च्यांवर कायमस्वरूपी रुळल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या सर्व परिस्थितीद्वारे रुग्ण सेवेचा कसा बोजवारा उडतोय, यावर आता गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.**




शासकीय, निमशासकीय लिपीक संवर्गिय हक्क परिषदेचे अध्यक्ष संजय जगदाळे यांनी याबाबत महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यांच्यानुसार अनेक डॉक्टर “अहरण अधिकारी” या पदनावाखाली रुग्ण तपासणे, शस्त्रक्रिया करणे किंवा आरोग्यसेवेची किमान जबाबदारीही पार पाडत नाहीत. पण पगार मात्र डॉक्टर पदाचा घेतात; काम मात्र प्रशासनातील मुख्य लिपीक, कार्यालयीन अधीक्षक किंवा प्रशासन अधिकारी यांच्यासारखे करतात. परिणामी रुग्णालयांचे प्रशासकीय कामकाज विस्कळीत झाले असून सर्वसामान्य रुग्णांच्या हक्कांवर गदा येत आहे.जागोजागी अनागोंदी, प्रशासकीय फायली अडकलेल्या, विभागांमधील समन्वय नसलेली स्थिती — अशा अनेक अडचणी रुग्णालयांत निर्माण झाल्या आहेत. “पगार क्लास-वन अधिकाऱ्याचा, पण काम मुख्यलिपीकाचे... आणि तेही निट होत नाही!” अशी टिका संजय जगदाळे यांनी केली आहे. रुग्णालये म्हणजे उपचाराची, आशेची, काळजीची ठिकाणे. पण डॉक्टरांच्या प्रशासकीय पदलालसेमुळे रुग्ण सेवेवर कुठे तरी विपरीत परिणाम होतोय का? या प्रश्नाचे उत्तर महापालिकेने देणे अत्यावश्यक ठरले आहे. शहराच्या आरोग्य व्यवस्थेचा पाया मजबूत ठेवायचा असेल, तर ही ‘अहरण अधिकारी’ संस्कृती तातडीने थांबविण्याची वेळ आली आहे, असा सूर वैद्यकीय संवर्गातही ऐकायला मिळत आहे. शहरातील वैद्यकीय व्यवस्था ही नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. महापालिका रुग्णालये, विभागीय रुग्णालये यामध्ये डॉक्टर हे सर्वात महत्त्वाचे घटक. मात्र सध्या वायसीएमसह अनेक रुग्णालयांमध्ये डॉक्टर आपापल्या मूळ वैद्यकीय पदाप्रमाणे काम न करता प्रशासकीय खुर्च्यांवर कायमस्वरूपी रुळल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

या सर्व परिस्थितीद्वारे रुग्ण सेवेचा कसा बोजवारा उडतोय, यावर आता गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### मागणी काय?

जगदाळे यांच्यानुसार, डॉक्टरांचे विभागप्रमुख म्हणून स्वागतच आहे. पण त्याच वेळी प्रशासनाशी संबंधित जबाबदाऱ्या प्रशासन अधिकारी व प्रशिक्षित कार्यालयीन अधीक्षकांच्याच जबाबदारीत ठेवाव्यात. रुग्णालयात योग्य कर्मचारी नियुक्त करावेत आणि डॉक्टरांनी मूळ कर्तव्य — रुग्णसेवा — हाच केंद्रबिंदू ठेवावा, अशी ठाम भूमिका परिषदेने मांडली आहे.

शासकीय, निमशासकीय लिपीक संवर्गिय हक्क परिषदेचे अध्यक्ष संजय जगदाळे यांनी याबाबत महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यांच्यानुसार अनेक डॉक्टर “अहरण अधिकारी” या पदनावाखाली रुग्ण तपासणे, शस्त्रक्रिया करणे किंवा आरोग्यसेवेची किमान जबाबदारीही पार पाडत नाहीत. पण पगार मात्र डॉक्टर पदाचा घेतात; काम मात्र प्रशासनातील मुख्य लिपीक, कार्यालयीन अधीक्षक किंवा प्रशासन अधिकारी यांच्यासारखे करतात. परिणामी रुग्णालयांचे प्रशासकीय कामकाज विस्कळीत झाले असून सर्वसामान्य रुग्णांच्या हक्कांवर गदा येत आहे.जागोजागी अनागोंदी, प्रशासकीय फायली अडकलेल्या, विभागांमधील समन्वय नसलेली स्थिती — अशा अनेक अडचणी रुग्णालयांत निर्माण झाल्या आहेत. “पगार क्लास-वन अधिकाऱ्याचा, पण काम मुख्यलिपीकाचे... आणि तेही निट होत नाही!” अशी टिका संजय जगदाळे यांनी केली आहे. रुग्णालये म्हणजे उपचाराची, आशेची, काळजीची ठिकाणे. पण डॉक्टरांच्या प्रशासकीय पदलालसेमुळे रुग्ण सेवेवर कुठे तरी विपरीत परिणाम होतोय का? या प्रश्नाचे उत्तर महापालिकेने देणे अत्यावश्यक ठरले आहे. शहराच्या आरोग्य व्यवस्थेचा पाया मजबूत ठेवायचा असेल, तर ही ‘अहरण अधिकारी’ संस्कृती तातडीने थांबविण्याची वेळ आली आहे, असा सूर वैद्यकीय संवर्गातही ऐकायला मिळत आहे.

# एका दिवसात ७२४ फलकांवर कारवाई

## निवडणुकीच्या पार्श्वभूमी: एक लाख रुपयांचा दंड वसूल केला

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांची अनधिकृत फलकबाजी वाढल्याने आकाशचिन्ह व परवाना विभागाने कारवाईसाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. विभागाच्या विविध पथकांनी शहरभरात धडक कारवाई करीत एका दिवसात ७२४ अनधिकृत फलक व किऑस्कवर कारवाई केली. त्यांच्याकडून एक लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे.**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना फलक, किऑक्स, पोस्टर, तसेच होर्डिंग लागले आहेत. चौक, बाजारपेठ, मंडई, उद्यान अशा वर्दळीच्या ठिकाणी मोठ्या संख्येने फलक उभारण्यात आले आहेत. जागा मिळेल तेथे फलक लावले जात आहेत. विद्युत खांब, झाड, वाहतूक नियंत्रक दिव्यांचा खांब, सुरक्षा कठडे (बॅरिकेड्स), सीमाभिंत आदी ठिकाणी धोकादायकरीत्या फलक लावलेले दिसून येत आहेत. त्यामुळे अपघात होण्याचा धोका वाढला आहे. अशा सर्व फलकांवर तातडीने कारवाई करण्याचा आदेश आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी दिला आहे.त्यानुसार, आकाशचिन्ह व परवाना विभागाने धडक कारवाई मोहीम हाती घेतली. हा विभाग आणि सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांतील पथकांनी गुरुवारी धडक कारवाई करीत एका दिवसात ७२४ फलक व किऑक्स जप्त केले. तसेच, नागरिक, संस्था, दुकानदार, व्यावसायिक यांच्याकडून एकूण एक लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ही कारवाई नियमितपणे सुरू राहणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक, तसेच काही संस्थांकडून विनापरवाना फलक व किऑक्स लावण्यात येतात.

### फलक, पोस्टर काढून जप्त

त्यामुळे शहर विद्रूप होत आहे. अपघाताचा धोका वाढला आहे. विनापरवाना उभारलेले फलक, पोस्टर काढून जप्त करण्यात येत आहेत. दंडात्मक कारवाई केली जात आहे. प्रसंगी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी सांगितले.क्यूआर कोड नसलेला फलक अनधिकृत परवाना निरीक्षकांनी शहरातील विविध भागातील जाहिरात फलकांची पाहणी केली. मात्र, अनेक फलकांच्या खाली क्यूआर कोड, फलकाची माहिती असलेली पाटी नसल्याचे दिसून येत आहे.

## मिशन-PCMC: पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला धक्का!

# प्रवीण भालेकर आता भाजपामध्ये प्रवेश करणार!

### आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वात पुन्हा निवडणुकीच्या मैदानात

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड : आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला पहिला धक्का बसला आहे. प्रभाग क्रमांक १२ चे माजी नगरसेवक प्रवीण भालेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडत भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.**




> “स्थानिक राजकारणात पक्षातील मक्तेदारी आणि कार्यपद्धतीमुळे नागरिकांचे हित योग्य प्रकारे साधता येत नव्हते. विकासाला प्राधान्य देत मी आमदार महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये काम करण्याचा निर्णय घेतला आहे.”
> **–प्रवीण भालेकर,** माजी नगरसेवक.

भालेकर यांच्या निर्णयामागील मुख्य कारण म्हणून स्थानिक पातळीवरील नगरसेवकाच्या मक्तेदारीमुळे पक्षातील कामकाजावर प्रभाव पडत असल्याचे सांगितले जात आहे.

प्रवीण भालेकर म्हणाले, “स्थानिक पातळीवरील राजकारणात पक्षातीलच एका नगरसेवकाची वाढती मक्तेदारी आणि कार्यशैली यामुळे मी त्रस्त झालो होतो. नागरिकांच्या कामांना योग्य न्याय मिळत नव्हता. त्यामुळे विकासाला प्राधान्य देत आमदार महेश लांडगे यांच्यासोबत भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे.” भोसरीचे आमदार महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली भालेकर भाजपमध्ये सक्रिय काम करणार आहेत. या प्रवेशामुळे प्रभागातील तसेच शहरातील राजकीय समीकरणांमध्ये लक्षणीय बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजपमध्ये प्रवेशानंतर भालेकर आपल्या प्रभागातील नागरिकांसाठी नवीन राजकीय दिशा आखतील.यासंदर्भात लवकरच औपचारिक घोषणा आणि प्रवेश कार्यक्रम आयोजित करण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्याने या घटनाक्रमावर प्रतिक्रिया देत सांगितले की, “पक्ष सोडल्याने आम्हाला निश्चितच धक्का बसला आहे. निवडणुकीपूर्वीच पक्षातील अंतर्गत कलह सार्वजनिक होत असल्याचे दिसून येते.”

---

## पुरवणी मागण्यांमध्ये आमदार महेश लांडगे “दस कदम आगे”

### पाणीपुरवठा ते गोशाळा पिंपरी-चिंचवडमधील 10 विषयांवर लक्ष वेधले

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात शहराच्या विकाससंदर्भातील 10 महत्त्वपूर्ण मुद्दे मांडत अक्षरशः “धमाका” उडवून दिला. शहराच्या सर्वंकष आणि शाश्वत विकासाशी निगडित असलेल्या विविध प्रकल्पांसाठी आवश्यक निधी व तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी ठामपणे केली. अधिवेशनाच्या पुरवणी मागणी सत्रामध्ये आमदार लांडगे “दस कदम आगे” असल्याचे पहायला मिळाले.**

### राज्य सरकारकडून अपेक्षीत निधी, मान्यता अन् कार्यवाहीची मागणी




> पिंपरी-चिंचवडच्या विकासाचा प्रत्येक मुद्दा मी सभागृहाच्या केन्द्रस्थानी ठेवला आहे. या शहराचा हक्काचा निधी मिळवून देणे ही माझी जबाबदारीच नव्हे, तर माझी वचनबद्धता आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडला विकासाची नवी दिशा मिळाली आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्न मार्गी लागत आहेत. मला खात्री आहे. पुरवणी मागण्यांमध्ये मांडलेले सर्व विषय शहराच्या हितासाठी महत्त्वपूर्ण आहेत. भाजपा महायुती सरकारच्या काळात हे सर्व विषय मार्गी लागतील. संबंधित प्रकल्पांना लागणारा निधी, सुविधा आणि पायाभूत प्रकल्प निश्चितपणे पूर्णत्वास येतील.
> **–महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

नागपूर येथे विधानसभेचे हिवाळी अधिवेशन आहे. अधिवेशनच्या तिसऱ्या दिवशी पुरवणी मागणी सत्र झाले. यामध्ये आमदार लांडगे यांनी विविध मागण्या केल्या. तसेच, सुमारे 35 लाख पिंपरी-चिंचवडकरांशी निगडीत विषय मार्गी लावण्यासाठी सकारात्मक व धोरणात्मक निर्णय घ्यावेत, अशी मागणी लावून धरली.

सभागृहात त्यांनी मांडलेल्या महत्त्वपूर्ण मागण्यांमध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश होता. वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी निधी : शहरातील कचरा व्यवस्थापन सक्षम करण्यासाठी हा टप्पा अत्यंत आवश्यक असल्याचे लांडगे यांनी स्पष्ट केले. पवना व मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी निधी : इंद्रायणी नदीच्या धर्तीवर व्यापक स्वच्छता व पर्यावरण सुधार यावर त्यांनी भर दिला. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी निर्बंधण्यासाठी उपाययोजना : आयटी व औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक कोंडीमुळे उद्योगांवर परिणाम होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. मेट्रोच्या नवीन मार्गिकांना तातडीने मान्यता : हिंजवडी, वाकड, पिंपळे सौदागर, भोसरी, चाकण, निगडी, मोशी, वाघोली यांना जोडणाऱ्या तीन महत्त्वाच्या मार्गिका त्वरित मंजूर करण्याची मागणी. संविधान भवन व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लायब्ररीसाठी निधी : भारतीय संविधान आणि विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास केंद्र व्हावे. भारतीय संविधाने अमृत महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. त्यामुळे कामाला प्राधान्य द्यावे, असा मुद्दाही आमदार लांडगे यांनी अधोरेखित केला.

पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाला गती द्या...

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या पाणी पुरवठ्यासाठी आवश्यक असलेला पवना बंद जलवाहिनी प्रकल्प स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन तातडीने काम सुरू करावा. तसेच, मुळशी आणि चासकमान धरणातून अतिरिक्त जलस्त्रोत व स्वतंत्र कोटा मिळावा. वाढत्या लोकसंख्येला आवश्यक पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी ठोस उपायांची मागणीही करण्यात आली. महावितरणचे स्वतंत्र मंडल कार्यालय : जलद सेवा आणि तक्रारनिवारणासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये स्वतंत्र कार्यालयाची मागणी करण्यात आली. तसेच, गोशाळांसाठी उपक्रम : राज्यातील सर्व महापालिकांत भटक्या गोवंशासाठी गोशाळा अनिवार्य करण्याचा प्रस्तावही आमदार लांडगे यांनी मांडला. यासह मराठा समाजाच्या वारस नोंदींसाठी सकारात्मक निर्णय भाजपा महायुती सरकारने घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी सभागृहात केली.

# समान नागरी कायद्याच्या दिशेने पाऊल




**भारतात उत्तराखंड राज्यात समान नागरी कायदा अंमलात येऊन काही महिने होतात तोच भा अंमलात आसाममध्ये बहुपत्नीत्व प्रतिबंध कायदा’ विधेयकास राज्याने मंजुरी दिली आहे. इंग्रजीत बायगामी आणि पॉलिगामी या दोन संज्ञा अनुक्रमे द्विभार्या आणि बहुपत्नीत्व या अथर्थाने वापरल्या जातात.**

मात्र या दोन्ही शब्दार्थानुसार वैध विवाहाची एक पत्नी हयात असताना आणि घटस्फोट झालेला नसताना केलेला दुसरा विवाह किंवा दोनपेक्षा जास्त विवाह असा आहे. शिवाय हे दोन्ही शब्द विशेष करून पुरुषाने महिलेशी केलेल्या विवाहाबद्दल आहेत. ब्रिटिश काळात, विविध भारतीय वैयक्तिक कायद्यांची संहिता तयार होण्यापूर्वी सर्वच धर्मात कमीअधिक प्रमाणात वहुपत्नी विवाह केले जात व ते स्वीकाराई होते. ख्रिस्ती धर्मात ब्रिटिश अंमलामुळे बहुपत्नीत्वास प्रतिबंध पहिल्यापासून होताच. आदिवासी आणि इतर जमातींना त्यांच्या प्रथा परंपरा अनुसरण्याचे स्वातंत्र्य होते, ते आजही अबाधित आहे. १९५५ च्या सुमारास हिंदू कायद्याअंतर्गत येणाऱ्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध समाजासाठी द्विभार्याप्रतिबंधाची तरतूद त्या कायद्यातच केली गेली. त्यामुळे भारतात प्रचलित असलेल्या प्रमुख धर्मापैकी एका मुस्लिम धर्मापुरती बहुपत्नीत्वाची प्रथा चालू राहिल्याचे ढोबळ चित्र निर्माण झाले.



- वास्तविक पाहाता राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण (२०१९-२०२२) अनुसार राष्ट्रीय स्तरावर ख्रिस्ती समाजात २.१%, मुस्लिम समाजात १.९%, हिंदू आणि बौद्ध समाजात १.३%, शीख समाजात ०.५% आणि इतर जाती, पंथ, समाजात मिळून २.५% बहुपत्नी विवाह आढळून आले असल्याची नोंद आहे. त्यामुळे या हमाममधे कमीजास्त प्रमाणात सगळेच आंघोळीस येतात हे तर स्पष्टच आहे. त्यामुळे यावरील चर्चेला कुठल्याही एका धर्माचा रंग न देता नेमका हा कायदा काय आहे आणि याची आवश्यकता, परिणाम व त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत यावर आपण थोडक्यात विचार करू.

आसामी बहुपत्नीत्व प्रतिबंध कायद्याचे उद्दिष्ट बहुपत्नीत्व आणि बहुपत्नीक विवाहास प्रतिबंध करणे व या प्रथेचे उच्चाटन करणे असे दिले आहे.

आसाममध्ये जन्मलेल्या व राहाणाऱ्या, आसाम राज्यातील मतदान यादीत नाव असलेल्या, आधार व पॅन कार्डवर आसाम राज्यातील पत्ता असलेल्या, आसाम राज्यातील रहिवासी असल्याचे शासकीय कागदपत्रं असलेल्या, आसाम राज्यातील सर्व शासकीय नोकरी धारकांना, आसामच्या शासकीय योजनेच्या लाभार्थ्यांना आणि आसाममधील स्थावर मालमत्ताधारक, अशा सर्वांना हा कायदा लागू होणार आहे. शिवाय आसामच्या रहिवाशाने राज्याबाहेर जाऊन दुसरा विवाह केला किंवा आसाममध्ये रहिवासी नसलेल्या व्यक्तीने जरी आसाममध्ये येऊन दुसरा विवाह केला तर त्यांनाही हा कायदा लागू असेल. या निकषांत कुठल्याही धर्माचा उल्लेख नाही. तसेच वर दिलेले निकष इतके सर्वसमावेशक आहेत की त्या निकषांतून कोणीच सुटायची शक्यता नाही. फक्त आसाममधील आदिवासी समाजास यातून विशेष घटनात्मक वर्ग म्हणून वजा केले आहे. हे पाहता हा कायदा कुठल्याही एका समाज वा धर्माकरिता किंवा त्याच्या विरोधात केला आहे, असे म्हणता येणार नाही. त्या अर्थाने हा निधर्मी कायदा आहे. कायद्यात दिलेल्या ‘वैवाहिक जोडीदार’ (स्पाऊस) च्या व्याख्येत पती वा पत्नी असा दोन्हींचा उल्लेख असल्याने कायद्याला बहुपत्नी (पॉलीगामी) आणि बहुपती (पॉलीयान्ड्री) विवाह दोन्ही अभिप्रेत आहे असे दिसते. म्हणजे हा कायदा लिंगभेदाधारित देखील नाही. संविधानाच्या निधर्मी आणि लिंगभेदभाव विरहित या दोन्ही निकषांत हा कायदा बसतो. २०१५ सालीच सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम धर्मात बहुपत्नीत्व हा उपलब्ध पर्याय आहे आणि धर्मपालनाची प्रमुख अट नाही असा निर्णय दिल्याने हा कायदा म्हणजे धर्मपालनाच्या मूलभूत संवैधानिक अधिकारावर घाला आहे, असेही म्हणता येणार नाही. त्यामुळे या कायद्याबद्दलची चर्चा सामाजिक दृष्टीने करणे प्राप्त ठरते. बहुविवाहात बहुपती आणि बहुपत्नी विवाह, दोन्ही बसत असले तरी बहुपत्नीत्वाची प्रथा जास्त प्रचलित आहे. बहुविचाहात, समाजातील पितृसत्ताक पद्धतीमुळे बहुपत्नी विवाहाच्या समस्या बहुपती विवाहाच्या तुलनेत खूप जास्त आणि गंभीर आहेत. बहुपत्नी विवाह सामाजिकदृष्ट्या महिला, मुले या समाजातील दुर्बल घटकांना घातक व कुटुंबसंस्थेला मारक ठरते. बहुविवाह पद्धतीमुळे मर्यादित कौटुंबिक संसाधनांचे असमान विभाजन होते.

## प्रासंगिक »

### सत्यशोधक

***ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव हे केवळ एक सामाजिक कार्यकर्ते नव्हते***

ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांचं व्यक्तिमत्त्व चतुरस्त्र होतं. विचारावर अढळ निष्ठा, कष्टकऱ्यांविषयी कमालीची कणव, जाती व्यवस्थेचा तिटकारा, समानतेचा पुरस्कार आणि सत्यशोधकी विचाराचा पगडा ही बाबांच्या वैशिष्ट्यांपैकी काही. बाबा आणि पुणे हे समीकरण झालं होतं, तरीही बाबा त्यांच्या मूळ गावाला कधीच विसरले नव्हते. पारनेर तालुक्यानं महाराष्ट्राला अनेक नररत्नं दिली. अलिकडच्या काळातील दोन महत्त्वाच्या व्यक्तींचा त्यात उल्लेख होतो. त्यापैकी एक म्हणजे बाबा आढाव आणि दुसरे म्हणजे रंगनाथ पठारे. हे दोघंही सांगवी सूर्या आणि जवळे या शेजार-शेजारच्या गावचे. अनेकांना ते माहीत असण्याचं काहीच कारण नाही; परंतु बाबा आवर्जून त्याचा उल्लेख करीत. कित्येक दशकात ते त्यांच्या गावाला गेले नसतील; परंतु जुन्या काही सहकाऱ्यांसोबत किंवा नगर जिल्ह्यातल्या शंकरराव घुले व अन्य सहकाऱ्यांसोबत असले.

वाढती संख्या या पार्श्वभूमीवर नागरी हवाई उड्डुण्ण महासंचालनालयाने (डीजीसीए) विमानाचे पायलट आणि केबिन क्रू यांच्या सेवेविषयी काही महत्वाचे बदल केले. या बदलाच्या अंमलबजावणीला दिलेल्या कालावधीला मुतदवाढ देऊनही देशातील हवाई वाहतूक कंपन्यांनी त्याची गांभीयनि दखल घेतली नाही.

## हवाई वाहतुकीचा सावळा गोंधळ

देशांतर्गत विमान वाहतुकीत इंडिगो या कंपनीचा वाटा ६५ टक्के आहे. कंपनीकडे उड्डाणासाठी नव्या नियमानुसार आवश्यक पायलट उपलब्ध नाहीत. या पार्श्वभूमीवर या कंपनीने सुमारे २ हजारांहून अधिक ताणे रद्द केली. आणखी काही उड्डाणे रद्द होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे लाखो प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला, अडचणींना आणि आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले, यामध्ये विमान कंपन्यांचा शासकीय आदेशांना न जुमानण्याचा हलगर्जीपणा जसा जवाबदार आहे, तसेच सरकारकडून कंपन्यांचे होणारे लाडही तितकेच कारणीभूत आहेत. पायलटांची संख्या मर्यादित ठेवणे, त्यांच्यावर अतिरिक्त कार्यभाराचा बोजा टाकणे आणि नफ्याच्या मागे लागणे हे धोरण अवलंबिल्यामुळे मध्यंतरी हवाई वाहतुकीत मोठे आव्हान निर्माण झाले. वाहतूक विस्कळीत झाली. काही विमान अपघाताच्या चौकशीमध्ये पायलटवरील अतिरिक्त ताण जबाबदार असल्याचा निष्कर्षही पुढे आला होता. जागतिक




स्तरावर पायलट थकव्यामुळे मानवी चुकांच्या सुमारे २० टक्के प्राणघातक अपघात होतात, असेही एक संशोधन पुढे आले. यामुळेच ‘डीजीसीए ने जानेवारी २०२४ मध्ये पायलट आणि केबिन क्रू यांच्यासाठी ‘विमानसेवा कालावधी मर्यादा’ (एफडीटीएल) ही नियमावली निश्चित केली. यामध्ये सलग ४८ तासांचा साप्ताहिक देशातील हवाई वाहतुकीच्या गोंधळाचा फटका प्रवाशांना बसला. दोन हजारांहून अधिक विमान उद्याने रद्द झाली. एक वर्षाची मुदतवाढ देऊनही अटी पूर्ण न करणाऱ्या विमान कंपन्यांचे लाड पुरविते कोण? विश्रांती कालावधी बंधनकारक केला. रात्रीच्या ड्युटीवर मर्यादा आल्या. रात्रीच्या उड्डाणाची व्याख्या पाचऐवजी मध्यरात्री ते सकाळी ६ अशी केली. प्री व पोस्ट फ्लाईट जवाबदाऱ्या धरून एका तासापेक्षा जास्त अतिरिक्त कामाची परवानगी नाकारली. तसेच दीर्घ मार्गावर सेवेसाठी अतिरिक्त २४ तासांची विश्रांती बंधनकारक केली. ही नियमावली जून २०२४ मध्ये अंमलात येणार होती. तथापि, विमान वाहतूक कंपन्यांच्या विनंतीनुसार डीजीसीए ने ही अंमलबजावणी जुलै व नोव्हेंबर २०२५ अशी दोन टप्प्यांत सुरू करण्यास अनुमती दिली. यामुळे विमान कंपन्यांना तब्बल एक वर्षाचा कालावधी उपलब्ध झाला होता. तथापि, खर्चात काटकसर आणि अतिरिक्त नफ्याच्या मागे लागलेल्या कंपन्यांनी त्याकडे साफ दुर्लक्ष केले आणि आता अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर उड्डाणे रद्द करून प्रवाशांना वेठीस धरणे सुरू झाले आहे. काही विमान कंपन्यांनी तिकिटाचे दर दसपटीहून अधिक वाढवत आपले खिसे गरम केले. त्यानंतर पंतप्रधान कार्यालयाने विमान कंपन्यांच्या नफेखोरीला लगाम घातला. विमान वाहतूकमंत्र्यांनी सखोल चौकशीचे आदेश देत कोणाचीही गय केली जाणार नाही, असा इशारा दिला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## जागतिक कीर्तीकडे पाऊल

## लिडकॉम आणि लिडकार यांच्यात सामंजस्य करार

# कोल्हापुरी चपलांची कीर्ती!

## कारागिरांसाठी आंतरराष्ट्रीय दारं खुली होतील



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताच्या पारंपारिक चर्मकला वारशाला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय लक्झरी ब्रँड प्राडा, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम लिडकॉम (संत रोहिदास चर्मउद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ) आणि कर्नाटक सरकारच्या लिडकार (डॉ. बाबू जगजीवनराम चर्मउद्योग विकास महामंडळ) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाला. मुंबईतील इटालियन वाणिज्य दूतावासात, इटली-भारत व्यापारी परिषदेत हा करार स्वाक्षरीत झाला.**

कोल्हापुरी चप्पलनिर्मिती आणि प्राडाचे आधुनिक, समकालीन डिझाइन्स यांचा संगम घडवून आणला जाणार आहे. तयार होणाऱ्या विशेष कलेक्शनची विक्री फेब्रुवारी २०२६ पासून प्राडाच्या जगभरातील ४० स्टोअर्समध्ये व त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर सुरू होईल.या करारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या सक्रिय प्रयत्नांमुळे मोठे पाठबळ मिळाले. कराराची अंमलबजावणी प्रधान सचिव आणि लिडकॉमचे अध्यक्ष डॉ. हर्षदीप कांबळे आणि लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालिका प्रेरणा देशभ्रतार यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट म्हणाले,"या भागीदारीमुळे महाराष्ट्र आणि कर्नाटकातील हजारो कारागिरांना प्रशिक्षण, रोजगार आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश मिळेल. भारतीय कारागिरांचा वारसा जागतिक स्तरावर अधिक दृढ होणार आहे."लिडकॉमच्या एमडी प्रेरणा देशभ्रतार म्हणाल्या, "जागतिक ब्रँड थेट आपल्या पारंपारिक कारागिरांसोबत काम करत असल्याने त्यांचे कौशल्य योग्य मान मिळवेल. पिढ्यानपिढ्या चालत आलेली कोल्हापुरी परंपरा या प्रकल्पातून जगासमोर उभी राहील."लिडकारच्या एमडी डॉ. के. एम. वसुंधरा यांनी सांगितले, "या सहकार्यामुळे प्रशिक्षण, रोजगार आणि जागतिक संधींची मोठी दारे उघडतील. कोल्हापुरी चपलांचा वारसा हा महाराष्ट्र-कर्नाटकातील कारागिरांचा शतकांपासूनचा अभिमान आहे."प्राडा समूहाच्या CSR प्रमुख लोरेंझो बर्टेली म्हणाले, "ही भागीदारी भारतीय कारागिरीला जागतिक मंचावर योग्य स्थान देईल. आम्ही 'MADE IN INDIA, INSPIRED BY KOLHAPURI' या दृष्टीकोनाशी बांधील आहोत."कोल्हापुरी चप्पल निर्मिती महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर आणि कर्नाटकातील बेळगावी, बागलकोट, धारवाड, विजापूर या आठ जिल्ह्यांत होते. २०१९ मध्ये त्यांना GI टॅग मिळाला, ज्यामुळे अस्सलता आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले.

भारताच्या पारंपारिक चर्मकला वारशाला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय लक्झरी ब्रँड प्राडा, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम लिडकॉम (संत रोहिदास चर्मउद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ) आणि कर्नाटक सरकारच्या लिडकार (डॉ. बाबू जगजीवनराम चर्मउद्योग विकास महामंडळ) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाला. मुंबईतील इटालियन वाणिज्य दूतावासात, इटली-भारत व्यापारी परिषदेत हा करार स्वाक्षरीत झाला.या उपक्रमाद्वारे पारंपारिक कोल्हापुरी चप्पलनिर्मिती आणि प्राडाचे आधुनिक, समकालीन डिझाइन्स यांचा संगम घडवून आणला जाणार आहे. तयार होणाऱ्या विशेष कलेक्शनची विक्री फेब्रुवारी २०२६ पासून प्राडाच्या जगभरातील ४० स्टोअर्समध्ये व त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर सुरू होईल. या करारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या सक्रिय प्रयत्नांमुळे मोठे पाठबळ मिळाले.

### राज्य सरकारचे पाठबळ

कराराची अंमलबजावणी प्रधान सचिव आणि लिडकॉमचे अध्यक्ष डॉ. हर्षदीप कांबळे आणि लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालिका प्रेरणा देशभ्रतार यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट म्हणाले,"या भागीदारीमुळे महाराष्ट्र आणि कर्नाटकातील हजारो कारागिरांना प्रशिक्षण, रोजगार आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश मिळेल.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही देशभक्त संघटना

# मुंबई लुटणाऱ्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांवर बोलू नये

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सत्तेसाठी हिंदुत्व आणि बाळासाहेबांचे विचार सोडणाऱ्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये, अशी सणसणीत टीका शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केली. हिंदू मंदिरात दिवा लावण्याचे आदेश देणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जी.आर स्वामीनाथन यांच्याविरोधातील महाभियोग प्रस्तावात उबाठा खासदारांनी स्वाक्षरी केल्याचे दाखवत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठाच्या बेगडी हिंदुत्वाचा पर्दाफाश केला.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही देशभक्त संघटना असून पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा यांच्यावर केलेली टीका हे समतोल ढासळ्याचे लक्षण असल्याचा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला. नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मुंबई लुटणाऱ्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांवर बोलू नये. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात देश आत्मनिर्भर होतोय. त्याच दरम्यान अयोध्येत राम मंदीर उभं राहिले. तसेच बाळसाहेबांचे जे स्वप्न होतं की काश्मिरमधील ३७० कलम हटवावं ते मोदीजींच्या नेतृत्वात



अमित शहा यांनी पूर्ण केल. मोदीजी आणि गृहमंत्री अमित शाहांवर टीका करणं दुर्दैवी, असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. अनेक वर्ष ज्यांनी मुंबई लुटली, मुंबईची तिजोरी धुतली. कोविड काळात रुग्णांची खिचडी गिळली, मिठीतला गाळ गिळला, रस्त्यातला डांबर खाल्ला, बॉडीबॅगमधून पैसे खाल्ले, खोटी कोविड सेंटर उभी करुन मढ्याच्या टाळुवरचे लोणी खाल्लं, अशा लोकांनी अमित शहांवर बोलणं मोठी शोकांतिका आहे. त्यांचा कुठंतरी समतोल ढासळला आहे त्यामुळे असे असंबधं बोलत आहेत, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली.ते पुढे म्हणाले की, दोन नंबरवाल्याने विधानसभा निवडणुकीत त्यांना शेवटच्या नंबरवर बसवले. मुख्यमंत्री असताना ते घटनाबाह्य पद आहे अशी टीका करत होते. घटनाबाहय शब्द त्यांच्या आवडीचा आहे. त्यांना बाबासाहेबांचे संविधान मान्य नाही त्यामुळे नेहमी ते घटनाबाह्य बोलून टाहो फोडतात, असे ते म्हणाले. त्यांच्या काळात अजित दादा उपमुख्यमंत्री होते. काचेच्या घरात राहणाऱ्यानी दुसऱ्यांच्या घरावर दगड मारु नये, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. आताची त्यांची परिस्थिती म्हणजे केविलवाणी धडपड आहे, असे ते म्हणाले. शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री होतो.

### महाभियोगाचा प्रस्ताव सादर

मुख्यमंत्र्यांना भेटायला बुके घेऊन जायचे आणि दुसरीकडे टीका करायची ही दुटप्पी भूमिका आहे. पायपुसणं करुन घेतलं त्यांना मुख्यमंत्र्यांवर टीका करण्याचा अधिकार नाही, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मद्रास हायकोर्टाचे न्यायमूर्ती स्वामीनाथन यांच्या विरोधात डीएमके आणि उबाठा यांनी महाभियोगाचा प्रस्ताव सादर केला.

प्रियंकाचे आक्रमक भाषण

## राहुल गांधींच्या नेतृत्वावर पक्षात प्रश्नचिन्ह!

# 2029 मध्ये मोठी राजकीय लढत?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेचे शीतकालीन अधिवेशन आतापर्यंत अनेक राजकीय घटनांनी गाजले आहे. या दरम्यान, 'वंदे मातरम'वरील चर्चा आणि निवडणूक सुधारणांच्या मुद्द्यावरून काँग्रेस (CONGRESS) पक्षाच्या अंतर्गत सत्ता संतुलन आणि नेतृत्वाच्या भूमिकेबद्दल नवीन प्रश्न उभे राहिले आहेत.**

### संसदेतील सर्वात मोठा राजकीय डाव!



'वंदे मातरम'वरील चर्चेदरम्यान राहुल गांधी (RAHUL GANDHI) संसदेत अनुपस्थित (गैरहजर) होते. परिणामी, सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याची जबाबदारी त्यांची बहीण आणि वायनाडच्या खासदार प्रियंका गांधी यांनी समर्थपणे पार पाडली. विशेष म्हणजे, प्रियंका गांधी यांनी त्याच दिवशी भाषण दिले, ज्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेला संबोधित केले होते. संसदीय परंपरेनुसार, हा थेट संघर्ष पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यात होणे अपेक्षित होते. परंतु, राहुल यांच्या गैरहजेरीमुळे आणि प्रियंका यांच्या ओजस्वी उपस्थितीमुळे चित्र बदलले. प्रियंका यांनी हसून आणि हलक्या उपहासाने आपले भाषण दिले, ज्याच्या शैलीची काही भाजप सदस्यांनीही प्रशंसा केली.पंतप्रधानांच्या भाषणाच्या वेळी त्या सभागृहात नव्हत्या, पण त्यांच्या उत्तरावरून स्पष्ट होते की त्या पूर्ण तयारीने आल्या होत्या. या भाषणामुळे काँग्रेस आणि 'INDIA' आघाडीच्या अनेक नेत्यांना आशेचा किरण दिसला. तथापि, प्रियंका नेतृत्वाची भूमिका घेण्यासाठी तयार आहेत की त्यांना थांबवले जात आहे, याबद्दल पक्षात संभ्रम आहे.दुसऱ्या दिवशी, राहुल गांधींना निवडणूक सुधारणांच्या मुद्द्यावर बोलायचे होते. संघर्ष होण्याची अपेक्षा होती, पण ना पंतप्रधान मोदी उपस्थित होते, ना राहुल गांधींनी "मतदान चोरी" पत्रकार परिषदेत दाखवलेला आक्रमक उत्साह दाखवला. राहुल गांधी भाषणाआधी थोडा वेळ सभागृहात आले आणि भाषण संपताच निघून गेले. त्यांच्या या भूमिकेमुळे काँग्रेस खासदारांना निराशा झाली.पंतप्रधानांनी राहुल गांधी यांच्या भाषणाला उत्तर दिले नाही. त्याऐवजी, गृहमंत्री अमित शाह यांनी अत्यंत धारदार, मुद्देसूद आणि प्रभावीपणे उत्तर दिले. या घटनेतून पंतप्रधान मोदींनी हा संघर्ष आपल्या दुसऱ्या क्रमांकाच्या नेत्यावर सोपवला असल्याचे संकेत मिळाले. या दोन दिवसांतील घटनांनी काँग्रेसच्या अंतर्गत सत्ता संतुलनाचे अनेक संकेत दिले. प्रियंका गांधी यांनी आपल्या भाषणातून त्या पक्षासाठी एक संभाव्य राष्ट्रीय चेहरा असू शकतात, याचे संकेत दिले. दुसरीकडे, राहुल गांधींचा दृष्टिकोन कमी धारदार दिसला आणि अमित शाह यांनी त्यांना राजकीय तर्कांनी घेरले.राहुल गांधी यांची अनियमित उपस्थिती आणि त्यांच्या भाषणातील ऊर्जेची कमतरता यामुळे पक्षात प्रश्न उभे राहिले आहेत.

अवघ्या ४८ तासांत काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाचे चित्र पूर्णपणे बदलून गेले आहे. आता पंतप्रधान थेट प्रियंका गांधींशी संघर्षात दिसत आहेत, तर राहुल गांधी अमित शाह यांच्यासमोर आहेत. अनेक काँग्रेस नेत्यांचे मत आहे की पक्षासमोर खरे आव्हान आता गांधी भावंडांच्या (राहुल-प्रियंका) भूमिका स्पष्ट करण्याचे आहे. राजकीय पंडितांनाही प्रियंका यांचे नेतृत्व राहुल यांच्यापेक्षा मजबूत वाटत आहे.

जर काँग्रेस पक्षाने भविष्यात असा कोणताही निर्णय घेतला, तर येणाऱ्या राजकीय लढ्यांमध्ये हे बदललेले चित्र स्पष्टपणे दिसू शकते आणि २०२९ चा सामना 'मोदी विरुद्ध प्रियंका' असा होऊ शकतो.संसदेचे शीतकालीन अधिवेशन आतापर्यंत अनेक राजकीय घटनांनी गाजले आहे. या दरम्यान, 'वंदे मातरम'वरील चर्चा पक्षाच्या अंतर्गत सत्ता संतुलन आणि नेतृत्वाच्या भूमिकेबद्दल नवीन प्रश्न उभे राहिले आहेत.

### पूर्ण तयारीसह उतरल्या प्रियंका

'वंदे मातरम'वरील चर्चेदरम्यान राहुल गांधीसंसदेत अनुपस्थित (गैरहजर) होते. परिणामी, सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याची जबाबदारी त्यांची बहीण आणि वायनाडच्या खासदार प्रियंका गांधी यांनी समर्थपणे पार पाडली. विशेष म्हणजे, प्रियंका गांधी यांनी त्याच दिवशी भाषण दिले, ज्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेला संबोधित केले होते.

# पब्लिसिटी स्टंट करणाऱ्याच्या याचिका बंद

## या याचिकेवरून सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी व्यक्त केली नाराजी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सरन्यायाधीश (सीजेआय) सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या (SUPREME COURT) खंडपीठाने मतदार यादीच्या संपूर्ण पुनर्विलोकन (SIR) ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी केली. या प्रकरणात याचिकांच्या नाराजीच्या सूरावर CJI सूर्यकांत (CJI SURYA KANT) यांनी नाराजी व्यक्त केली.**

तसेच कडक शब्दांमध्ये टीका देखील केली. SIR विरोधीच्या या याचिका पब्लिसिटी स्टंट असल्याचे म्हणत सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी फटकारले आहे. तसेच सामान्य लोकांच्या सुनावणीसाठी देखील वेळ दिला पाहिजे अशी खंत देखील सरन्यायाधीश यांनी बोलून दाखवली. नेहमीच अति महत्त्वाचे विषय म्हणत अशा सर्व विषयांवर सुनावणी होते तर सामान्य लोकं मागे बसून अखेर निराश होऊन निघून जातात, असे देखील सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले आहेत.SIR विरोधाच्या सततच्या ओघावर नाराजी व्यक्त करताना सीजेआय म्हणाले की हे सर्व प्रसिद्धीसाठी आणि पब्लिसिटीसाठी केले जात आहे. आपल्याला केवळ एसआयआर सारख्या मोठ्या प्रकरणांवरच



नव्हे तर सामान्य लोकांशी संबंधित प्रकरणांवरही लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. यावेळी एक उदाहरण देताना ते म्हणाले, "रेल्वे अपघाताचे प्रकरण पहा... एका व्यक्तीचा रुळांवर मृत्यू झाला... आम्ही काही भरपाई दिली पण वारसांना काहीही मिळाले नाही. भरपाई न मिळाल्याने ते गायब झाले. आता आम्ही त्यांना शोधून काढले आहे आणि त्यांना पैसे मिळतील याची खात्री केली आहे... त्या विधवेच्या चेहऱ्यावरील हास्याची कल्पना करा?" असे वास्तव सरन्यायाधीशांनी न्यायालयामध्ये मांडले.दरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, "आता, बार सदस्यांना प्रत्येक बाबींसाठी एक वेळ निश्चित करावी लागेल कारण काही तातडीच्या बाबी न्यायालयाचा सर्व वेळ घेतात आणि अनेक बाबींमध्ये, विशेषतः MACT बाबींमध्ये, याचिकाकर्त्यांना वेळ मिळत नाहीSIR सारख्या तातडीच्या बाबी संपूर्ण दिवस घेतात. भरपाईच्या बाबींसाठी येणारे याचिकाकर्ते शेवटच्या रांगेत बसतात आणि संध्याकाळी ४ वाजता सुनावणीशिवाय घरी जातात, त्यांना त्यांची पाळी कधी येईल हे माहित नसते

### सुनावणींसाठी समान वेळ हवी

.ते निराश होऊन घरी जातात. त्यांना देखील सुनावणीसाठी वेळ दिला पाहिजे," अशा शब्दांत न्यायालयातील प्रलंबित याचिका आणि सुनावणीसाठी न मिळणारा वेळ या गोष्टी बोलून दाखवल्या आहेत.आज (११ डिसेंबर) सरन्यायाधीश (सीजेआय) सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मतदार यादीच्या संपूर्ण पुनर्विलोकन ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी केली.

# मीरा जोशीने घेतलं नवीन घर!



मराठी मनोरंजन विश्वात अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्यांनी स्वतःचं स्थान निर्माण केलंय.

मराठी मनोरंजन विश्वातील अभिनेत्री प्राजक्ता माळीने काहीच दिवसांपूर्वी कर्जतला स्वतःचं नवीन घर घेतलं. आता प्राजक्ता नंतर आणखी एका मराठी अभिनेत्रीने स्वतःचं आलिशान घर घेतलंय. ही अभिनेत्री म्हणजे मीरा जोशी. मीरा जोशीने पुण्यात स्वतःचं घर विकत घेतलंय. मीराच्या नवीन घरातील गृहप्रवेशाचे फोटो व्हायरल झाले आहेत. मीराने सोशल मिडीयावर काही फोटो पोस्ट केलेत. या फोटोत मीराचा भाऊ सलील जोशी, आई स्मिता जोशी आणि तिचे बाबा दिसत आहेत.

मीराने पुण्यातील नवीन घरात पुजा करत गृहप्रवेश केलाय. मीराच्या हातात कलश दिसुन येतोय. नवीन घर घेतल्याने मीरा आणि तिचं संपूर्ण कुटुंब खुप आनंदात आहे. मीरा काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल चाहत्यांना माहिती दिली आहे. आपण प्रेमात पडल्याचं तिने सांगितलं आहे. तिने तिच्या बॉयफ्रेंडसोबतचे काही फोटोही शेअर केले होते. या फोटोत समुद्रकिनाऱ्यावर उभे आहेत. तर तिचा बॉयफ्रेंड पाठमोरा उभा आहे. तिने त्याचा चेहरा दाखवला नसल्याने तो नेमका कोण आहे याची उत्सुकता सगळ्यांनाच लागून राहिली आहे. मीराने उरण समुद्रकिनाऱ्यावरचे फोटो शेअर केले आहेत. तिने तिच्या प्रियकराचा चेहरा आणि नाव गुदस्त्यात ठेवलं असलं तरी चाहते तिच्यासाठी प्रचंड आनंदी आहेत. अभिनेत्री ऋतुजा बागवे, मेघना एरंड अशा अभिनेत्रींनी मीराचं अभिनंदन केलंय. मीराने ही उत्तम अभिनेत्री आणि डान्सर आहे. अभिनेत्री मीरा जोशी हिचा मुंबई पुणे द्रुतगती मार्गावार अपघात झाला आहे. या संदर्भात अभिनेत्रीने स्वतः सोशल मिडियावर पोस्ट सह शेयर करत माहिती दिली आहे. या अपघातात अभिनेत्रीला फारशी इजा झाली नसली तरी तिच्या गाडीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.

# समृद्धीची सेटवरची पोस्ट



'स्टार प्रवाह' वाहिनी लवकरच एक नवी मालिका प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहे. या मालिकेत अभिनेत्री समृद्धी केळकर व अभिनेता अभिषेक रहाळकर मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. 'हळद रुसली कुंकू हसलं' असं या मालिकेचं नाव आहे. यामधून समृद्धी व अभिषेक पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. दोघांनीही यापूर्वी 'स्टार प्रवाह' मालिकांमध्ये काम केलं आहे.

'हळद रुसली कुंकू हसलं' या मालिकेचा तीन दिवसांपूर्वी 'स्टार प्रवाह'ने सोशल मीडिया पेजवरून पहिला प्रोमो शेअर केला होता. या प्रोमोला 'ती अस्सल गावरान, तो पक्का शहरी' असं कॅप्शन देण्यात आलं होतं. 'स्टार प्रवाह'ने शेअर केलेल्या प्रोमोमधून अभिषेक हा शहरातून आलेला मुलगा तर समृद्धी ही गावा खेड्यातील मुलगी असते, असं काहीचं चित्र पाहायला मिळतं. परंतु, या प्रोमोमधील अजून एका गोष्टीने सर्वांचं लक्ष वेधलं, ती म्हणजे समृद्धीसह असलेली तिची गाय. समृद्धीचं तिच्या गायीसह घट्ट नातं असून ती तिची मैत्रीण असते, जिचं नाव स्वाती असं असल्याचं प्रोमोमधून पाहायला मिळतं. अशातच आता अभिनेत्रीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टला तिने 'मी आणि माझी स्वाती' असं कॅप्शन दिलं आहे आणि कसा वाटला प्रोमो, असा प्रश्नही तिने तिच्या चाहत्यांना विचारला आहे.समृद्धी व अभिषेक या मालिकेसाठी कोल्हापुरात शूटिंग करत आहेत.

# जान्हवीलाच ठरवलं 'महामूर्ख



लक्ष्मी निवास' मालिकेतील जयंत-जान्हवीची जोडी कायम चर्चेत असते. संशयी व विकृत स्वभावामुळे जयंतला नेहमीच ट्रोल केलं जातं. लग्नाआधी जयंत कायम जान्हवीशी प्रेमाने वागताना दिसायचा. पण, त्याच्या प्रेमामागे लपलेली विकृती, त्याचा विक्षिप्त स्वभाव हळूहळू जान्हवीसमोर येत आहे.लग्नानंतर पहिल्याच दिवशी जयंतने जान्हवीसमोर झुरळ खाल्लेलं असतं. याशिवाय जरा काही चूक केल्यास तो जान्हवीला भयंकर शिक्षा देत असतो. यामुळे जान्हवीने एकदा जयंतचं घर सोडून जाण्याचा प्रयत्न देखील केला होता. पण, शेवटी लग्न, प्रेम हा सगळा विचार करून ती घर परत येते. आताही जयंतच्या मनात जान्हवी अन् मॅंड्या ( विश्वा ) नात्याबद्दल संशय असतो. पण, 'मॅड' नेमका कोण आहे? हे जयंतला माहिती नसतं. आता जयंत जान्हवीची नवीन परीक्षा घेणार आहे.जान्हवी वटपौर्णिमेचं व्रत करणार असते. यासाठी ती आदल्यादिवशी सगळी तयारी करून ठेवते. पण, विकृत जयंत एक मोठी खेळी खेळणार आहे. जान्हवी नवऱ्याला झोपेतून जागं करण्याचा प्रयत्न करत असते. पण, जयंत काही केल्या प्रतिसाद देत नसतो. कारण, हाच जयंतचा मूळ प्लॅन असतो. जान्हवी आपल्याला वाचवण्यासाठी काय-काय करू शकते हे त्याला पाहायचं असतं.

# नाटकाचा प्रयोग सुरू असताना गर्भपात झाला

अभिनेत्री सुरभी भावेने 'भाग्य दिले तू मला', 'स्वामिनी' या मालिकांमध्ये काम करत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. आता सध्या 'तू ही रे माझा मितवा' या मालिकेत ती वल्लरी ही भूमिका साकारत आहे. अभिनेत्री सोशल मीडियाद्वारे चाहत्यांच्या संपर्कात असते. अनेकदा ती तिच्या भावना व्यक्त करतानादेखील दिसते. आता एका मुलाखतीत अभिनेत्रीने तिच्या खासगी तसेच अभिनयातील प्रवासाबद्दल वक्तव्य केले आहे. याबरोबरच, नाटकाच्या प्रयोगादरम्यान गर्भपात झाल्याचा खुलासा तिने केला आहे.सुरभी भावेने 'मराठी मनोरंजन विश्व'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत अभिनेत्री म्हणाली, "मी कधीच वाईट मार्ग अवलंबून कधीच कुठलीच कामं मिळवली नाहीत आणि इथून पुढे मिळवणारही नाही. माझी माझ्या कामावर प्रचंड श्रद्धा आहे. यामुळेच माझी मुलगी तीन महिन्यांची झाल्यानंतर मी कामाला सुरुवात केली होती.



ती ज्या दिवशी तीन महिन्यांची झाली, त्या दिवशी मी सेटवर होते."अभिनेत्री असेही म्हणाली की, ती कामाला प्राधान्य देते. सुरभी म्हणाली, "जेव्हा मी गरोदर होते, तेव्हा मला अनेक लोकांनी असं सांगून घाबरवलं होतं की आता पाच वर्षांचा गॅप येणार. पण, मला पाच महिनेही गप्प बसायचं नाही, कारण मला कामाची सवय होती. यामध्ये माझ्या पतीने मला साथ दिली. घरच्यांनी पाठिंबा दिला." सुरभी भावे एक प्रसंग सांगत म्हणाली, "पहिल्या मुलीनंतर पुन्हा गरोदर होते. माझा नाटकाचा प्रयोग सुरू होता आणि त्या चालू नाटकाच्या प्रयोगात माझा गर्भपात झाला होता. पण, त्याही वेळेला मी कधी थांबले नाही किंवा अतिशयोक्ती केली नाही. माझं असं म्हणणं होतं की जे व्हायचं आहे, ते घडून गेलं आहे, प्रयोग थांबवण्यात काही अर्थ नाही. तेव्हाही माझ्या नाटकातील सहकलाकारांनी मला खूप पाठिंबा दिला. 'सागरा प्राण तळमळला' नावाचं नाटक होतं. त्यामध्ये संध्या म्हात्रे, अंगद मस्कर ही सगळी मंडळी होती. जेव्हा त्यांना याबद्दल कळलं तेव्हा तो सगळ्यांसाठीच भावूक क्षण होता. त्यानंतर मी दवाखान्यात गेले. पुन्हा दुसऱ्या दिवशी शूटिंगला गेले होते", अशी आठवण सुरभीने सांगितली आहे.

**लज्जास्पद विक्रम :** एका T20 सामन्यात टाकली 13 चेंडूंची ओव्हर

# अर्शदीप हे काय करुन बसला!

## जागतिक विक्रमाशी साधली बरोबरी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात न्यू चंदीगडमधील मुल्लानपूर येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर दूसरा टी २० सामना खेळला जात आहे. टॉस गमावणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करत भारतासमोर २१४ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. या सामन्यात भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने निराशाजनक कामगिरी केली आहे. त्याने टी २० क्रिकेटमध्ये १३ चेंडूंचे षटक टाकले आणि लाजिवाणा विक्रम रचला आहे.**



अर्शदीपने एका ओव्हरमध्ये ७ चेंडू वाईड टाकले. या कामगिरीसह, तो टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात १३ चेंडूंचे षटक टाकणारा पहिला भारतीय गोलंदाज ठरला आहे. टी-२० क्रिकेटमध्ये हा विक्रम अत्यंत दुर्मिळ असून एका गोलंदाजासाठी तो अत्यंत लज्जास्पद मानला जातो. अर्शदीपच्या या षटकाने चाहते आणि तज्ञ दोघांना देखील आश्चर्यचकित केले आहे. अर्शदीप सिंग आता टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात १३ चेंडूंचे षटक टाकणारा जगातील दुसरा गोलंदाज ठरला आहे. ज्यामध्ये ६ कायदेशीर चेंडू आणि ७ वाईडचा समावेश होता. यापूर्वी, हा विक्रम अफगाणिस्तानच्या नवीन उल हकच्या नवे जमा होता. ज्याने गेल्या वर्षी झिम्बाब्वेविरुद्ध १३ चेंडूंचे षटक टाकले होते, ज्यामध्ये ६ वाईड आणि १ नो-बॉल होता. पूर्ण सदस्य संघातील इतर कोणत्याही गोलंदाजाने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात इतका लांब ओव्हर टाकली नाही. दक्षिण आफ्रिकेच्या सिसंदा मगालाने २०२१ मध्ये जोहान्सबर्गमध्ये पाकिस्तानविरुद्ध १२ चेंडूंची ओव्हर टाकली होती.. तथापि, अर्शदीप सिंगने मगालाला मागे टाकत नवीन उल हकच्या विक्रमाशी बरोबरी साधली आहे. अर्शदीप सिंगची ही ओव्हर त्याच्या कारकिर्दीतील सर्वात वाईट कामगिरी जरी ठरली असली तरी चाहते आणि विश्लेषक टी-२० क्रिकेटमध्ये ही एक दुर्मिळ घटना असल्याचे मानत आहेत.भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने त्याच्या पहिल्या दोन षटकांमध्ये २० धावा मोजल्या. डिंक्स ब्रेकनंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने त्याला गोलंदाजीसाठी पुन्हा पाचारण केले. अर्शदीपने ११ व्या षटकात १८ धावा दिल्या, ज्यात त्याने सात वाईड टाकले होते. यात एक षटकार, तीन एकेरी आणि एक दुहेरी धावांचा समावेश होता.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या T20 मालिकेतील दुसऱ्या सामन्यात नाणेफक गमावणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करत क्विंटन डी कॉकच्या स्फोटक अर्धशतकाच्या जोरावर ४ बाद २१३ धावा केल्या आहेत. क्विंटन डी कॉकने ४६ चेंडूचा सामना करत ९० धावांची खेळी केली. त्याने या खेळीत ५ चौकार आणि ७ षटकार ठोकले. भारताला विजयासाठी २१४ धावा कराव्या लागणार आहेत.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात न्यू चंदीगडमधील मुल्लानपूर येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर दूसरा टी २० सामना खेळला जात आहे. टॉस गमावणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करत भारतासमोर २१४ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. या सामन्यात भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने निराशाजनक कामगिरी केली आहे. त्याने टी २० क्रिकेटमध्ये १३ चेंडूंचे षटक टाकले आणि लाजिवाणा विक्रम रचला आहे. अर्शदीपने एका ओव्हरमध्ये ७ चेंडू वाईड टाकले. या कामगिरीसह, तो टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात १३ चेंडूंचे षटक टाकणारा पहिला भारतीय गोलंदाज ठरला आहे. टी-२० क्रिकेटमध्ये हा विक्रम अत्यंत दुर्मिळ असून एका गोलंदाजासाठी तो अत्यंत लज्जास्पद मानला जातो. अर्शदीपच्या या षटकाने चाहते आणि तज्ञ दोघांना देखील आश्चर्यचकित केले आहे.अर्शदीप सिंग आता टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात १३ चेंडूंचे षटक टाकणारा जगातील दुसरा गोलंदाज ठरला आहे.

### १२ चेंडूंची ओव्हर टाकली

ज्यामध्ये ६ कायदेशीर चेंडू आणि ७ वाईडचा समावेश होता. यापूर्वी, हा विक्रम अफगाणिस्तानच्या नवीन उल हकच्या नवे जमा होता. ज्याने गेल्या वर्षी झिम्बाब्वेविरुद्ध १३ चेंडूंचे षटक टाकले होते, ज्यामध्ये ६ वाईड आणि १ नो-बॉल होता. पूर्ण सदस्य संघातील इतर कोणत्याही गोलंदाजाने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात इतका लांब ओव्हर टाकली नाही. दक्षिण आफ्रिकेच्या सिसंदा मगालाने २०२१ मध्ये जोहान्सबर्गमध्ये पाकिस्तानविरुद्ध १२ चेंडूंची ओव्हर टाकली होती.

# क्विंटन डी कॉकचे वादळी अर्धशतक!

## दक्षिण आफ्रिकेचे भारतासमोर 214 धावांचे लक्ष्य; चक्रवर्ती चमकला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या T20 मालिकेतील दुसरा सामना आज चंदीगडमधील मुल्लानपूर स्टेडियमवर खेळला जात आहे. या सामन्यात नाणेफक गमावणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करत क्विंटन डी कॉकच्या स्फोटक अर्धशतकाच्या जोरावर 4 बाद 213 धावा केल्या आहेत.**





आता भारताला विजयासाठी धावा कराव्या लागणार आहेत. भारताकडून वरुण चक्रवर्तीने शानदार गोलंदाजी करत सर्वाधिक 2 विकेट्स घेतल्या.भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे आणि दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केले. क्विंटन डी कॉक आणि रिजा हेंड्रिक्स यांनी दक्षिण आफ्रिकेच्या डावाची सुरुवात केली. दक्षिण आफ्रिकेची सुरुवात दमदार झाली. या वेळी क्विंटन डी कॉक चांगलाच आक्रमक दिसून आला. डी कॉक आणि हेंड्रिक्स यांनी पहिल्या गड्यासाठी 38 धावांची भागीदारी केली. हेंड्रिक्स 8 धावा करून माघारी गेला. त्याला वरुण चक्रवर्तीने माघारी पाठवले. त्यानंतर क्विंटन डी कॉकने मैदानात आलेल्या एडन मार्करामसोबत 83 धावांची भागीदारी रचत संघाला मजबूत स्कोअरकडे पोहचवले.

### च्रकवर्तीने 2 विकेट्स घेतल्या

नंतर डी कॉकही 46 चेंडूत 90 धावा करून बाद झाला. त्याने 5 चौकार आणि 7 षटकार मारले. तो धावा बाद झाला. त्यानंतर डोनोवन फरेरा(नाबाद 30 धावा) आणि डेव्हिड मिलर(20 धावा) यांनी अभेद्य 53 धावांची भागीदारी रचत संघाला 213 पर्यंत पोहचवले. भारताकडून वरुण च्रकवर्तीने सर्वाधिक 2 विकेट्स घेतल्या तर अक्षर पटेलने 1 विकेट घेतली.

नंतर मार्कराम 26 चेंडूत 29 धावा करून बाद झाला. त्यानंतरही क्विंटन डी कॉकने आपला आक्रमक खेळ खेळत राहिला आणि त्याने अर्धशतक पूर्ण केले. मार्करामनंतर देवाल्ड ब्रुविस मैदानात आला पण तो काही खास करू शकला नाही. तो 14 धावा करून बाद झाला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। शुक्रवार ।
। दि. 12 डिसेंबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शिक्षण विश्व: प्रतिभा जीवन गौरव पुरस्कार प्रदान

# ‘युवा वर्ग भारताचा भाग्यविधाता’: पद्मश्री गिरीश प्रभुणे

### आत्मनिर्भर भारताची संकल्पना ही युवा पिढीच घडवू शकते

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : युवा पिढी ही विकसित भारताची शक्ती आहे. या युवा पिढीतूनच भारताचा नवा भाग्योदय होऊ शकतो. आत्मनिर्भर भारताची संकल्पना ही युवा पिढीच घडवू शकते असे पद्मश्री गिरीश प्रभुणे म्हणाले.**



कमला शैक्षणिक संकुलात 19 व्या वर्धापन दिनानिमित्त तीन दिवसीय प्रतिभा सृजन व्याख्यानमालेचे आयोजन केले. या शैक्षणिक संकुलाचे संस्थापक डॉ दीपक शहा त्यांचे सर्व सहकारी व कुटुंबीय, संचालक विद्यार्थी ,पालक कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिला .

प्रतिभा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केल्यानंतर गिरीश प्रभुणे म्हणाले या शिक्षण संस्थेमार्फत माझा सत्कार होत आहे . हा माझा खूप मोठा सन्मान आहे. ते पुढे म्हणाले ~~एका कोलंबसाने ते पुढे म्हणाले शोधली~~ आज हा देश जगात सर्वश्रेष्ठ देश बनला आहे . आपण सर्वजण कोलंबस बनलो तर , जगात भारताचे सर्वश्रेष्ठ देश जगात बनण्यास वेळ लागणार नाही . सन २०४७ साली भारत देश १०० वर्षांच्या स्वतंत्रता होईल, तोपर्यंत या सर्व समस्या आपण दूर करू . २० ते २५ वर्षे आपल्या हातात आहे. आपण त्या वयातील आहात की भारताचे तुम्ही भाग्य बदलू शकता . आज संस्थेच्या वतीने माझा पहिला सन्मान केला, मी डॉ दीपक शहा यांचे आभार मानतो .

प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या वतीने १९ व्या वर्धापन दिनानिमित्त तीन दिवसीय प्रतिभा सृजन व्याख्यानमालाचे आयोजन व समाजातील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पद्मश्री गिरीश प्रभुणे यांचा प्रतिभा जीवन गौरव पुरस्कार व मानपत्र संस्थेच्या अध्यक्षा प्रतिभा शहा , संस्थापक डॉ. दीपक शहा व त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने त्यांना पुणेरी पगडी प्रदान करून शाल ,पुष्पगुच्छ , स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन सन्मानाने गौरविण्यात आले .यावेळी व्यासपीठावरती संस्थेच्या अध्यक्षा प्रतिभा शहा ,खजिनदार भूपाली शहा , संचालिका डॉ तेजल शहा, दैनिक लोकमतचे संपादक व व्याख्याते संजय आवटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व पुण्यभूषण संस्थेचे संस्थापक डॉ सतीश देसाई , मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ राजेंद्र कांकरिया, डिंपल शहा समवेत प्राचार्या ,उपप्राचार्या व्यासपीठावर उपस्थित होते .

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ सतीश देसाई आपल्या मनोगतात म्हणाले, शून्यातून निर्माण करणे म्हणजे काय याचे जिवंत उदाहरण डॉ दीपक शहा आहे असे मी मानतो. कर्तुत्व नेतृत्व सगळ्यांकडे असते पण दातृत्व असणे महत्त्वाचे आहे. श्री शहा यांनी नेहमी देण्याचेच काम केले आहे. तुम्ही या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वळण देण्याचे काम करता तुमच्या या कामाला मानाचा मुजरा करतो . अशा शब्दात कौतूक केले . सत्कारमूर्ती पद्मश्री गिरीश प्रभुणे बाबत ते पुढे म्हणाले , समाज घडविण्याची क्रिया एक माणूस करू शकते अशी माणसे समाजात आहे म्हणूनच घडत आहे तो एक माणूस म्हणजे आदरणीय , वंदनीय श्री प्रभुणे आहे हे सांगून आपल्या शब्दांना विराम दिला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ दीपक शहा मार्गदर्शन करताना म्हणाले ,सन २००६ साली या संस्थेचे भूमिपूजन करण्यात आले. आज येथे विविध शाखेतून ८ हजारा पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहे. त्यांना चांगले शिक्षण व संस्कार येथे दिले जातात .त्यांच्या पालकांनी विश्वास ठेवून येथे प्रवेश घेतला त्यांना धन्यवाद देतो .विद्यार्थ्यांची अपेक्षा, स्वप्ने पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जातो. त्याना चांगली दिशा देण्याचे काम येथे केले जाते. भविष्यात स्वतःला सिद्ध करायचे आहे त्यासाठी त्यांच्या सर्वांगीण विकास केला जातो. शिक्षण , कला, क्रीडा, साहित्य , नाट्य, चित्रपट क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाने आज अनेक येथील विद्यार्थीनी आपली वेगळी छाप पाडून स्वतःचे अस्तित्व निर्माण केले आहे . संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून यापुढे दरवर्षी तीन दिवसीय व्याख्यानमाला व उल्लेखनीय क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना प्रतिभा जीवन गौरव पुरस्कार देण्यात येईल अशी ग्वाही दिली .

व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफतांना दैनिक लोकमतचे संपादक संजय आवटे आपल्या व्याख्यानात म्हणाले, आज माझ्यासमोर महाविद्यालयीन युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित आहे याचा मला विशेष आनंद वाटतो. तुम्हाला जीवनात डॉक्टर ,कलेक्टर जे व्हायचय ते व्हा , कुठल्याही क्षेत्रात जावा परंतु तुम्हाला सतत हसतमुख राहता आले पाहिजे . आनंदाने जगता आले पाहिजे . आजच्या नव्या पिढीला भाषा कळली पाहिजे व त्या भाषेत बोलता आले पाहिजे. त्यासाठी अभ्यास करा, ज्ञानात भर पाडा . लक्षात ठेवा , जग बदलत आहे या बदलणाऱ्या जगात बदलणाऱ्या भाषेत बोलता आले पाहिजे.आजच्या युवा पिढीची क्षमता बुद्धिमत्ता ही मागच्या पिढीत नव्हती . प्रत्येकाने आपले ध्येय निश्चित करून अपेक्षित यश संपादन करा असे शेवटी आवाहन केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ राजेंद्र कांकरीया यांनी केली .सूत्रसंचालन डॉ रोहित अकोलकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ सुवर्णा गोगटे यांनी केले प्रतिभा जीवन गौरव पुरस्कार सन्मानपत्राचे वाचन प्राचार्या डॉ क्षितिजा गांधी यांनी तर आभार उपप्राचार्या डॉ जयश्री मुळे यांनी मानले .व

## ४० हजार कुत्र्यांची नसबंदी खरंच झाली का?

### भाजपावर माधव पाटील यांचा गंभीर आरोप; ‘नसबंदीच्या आकड्यांत मोठा घोटाळा’

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप चव्हाट्यावर आले आहेत. मंगळवारी विधानसभेत आमदार महेश लांडगे यांनी नागपुरात या प्रश्नावर भाष्य केले. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते माधव पाटील यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया देत थेट आमदार लांडगे व भाजप सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप केले.**



पाटील यांनी म्हटले की, “गेल्या आठ वर्षांपासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सत्ता भाजपची आहे. महेशदादा स्वतः ११ वर्षांपासून आमदार आहेत. तरी आज शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या लाखांच्या घरात पोहोचली आहे, तर त्याला जबाबदार कोण?” पाटील यांनी सांगितले की शहरातील नागरिक—लहान मुलांपासून महिलांपर्यंत आणि रात्री कामावरून परतणाऱ्या लोकांपर्यंत—भटक्या कुत्र्यांच्या त्रासाला रोज सामोरे जात आहेत.

कोरोना काळातील नसबंदी मोहिमेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “कोरोना काळात ७,१२५ कुत्र्यांची नसबंदी झाल्याचा रिपोर्ट आहे. जेव्हा नागरिक घराबाहेर पडत नव्हते, त्यावेळी नसबंदी कसली झाली? ह्यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट दिसते,” असा आरोप पाटील यांनी केला. पुणे महानगरपालिकेने तिथली कुत्री पिंपरी चिंचवडमध्ये सोडल्याचे प्रकरणही पाटील यांनी पुन्हा उचलून धरले. “शहराचे कारभारी म्हणून तुम्हीच जबाबदार असताना पुण्यातील कुत्री भोसरी मतदारसंघात आणून सोडली गेली. तेव्हा तुम्ही कुठे होता?” असा थेट सवाल त्यांनी लांडगे यांना केला.

भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर आपण वेळोवेळी आवाज उठवला असून, डॉग शेल्टर उभारणीसाठीही महानगरपालिकेत पाठपुरावा केला, पण प्रशासन आणि सत्ताधारी उदासीन असल्याचा आरोप पाटील यांनी केला. “पायाभूत सुविधा उभारण्यापेक्षा भाजप नेत्यांना मलईखाण्यातच रस आहे,” असेही त्यांनी हल्लाबोल करताना म्हटले. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबाबत आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांबाबत महापालिका व भाजपकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. “कोरोना काळात ७ हजारांहून अधिक कुत्र्यांची नसबंदी झाली, असे कागदोपत्री दाखवले जाते. पण त्या काळात लोकच घराबाहेर पडत नव्हते, मग नसबंदी कोणाची आणि कुठे केली? हा सरळसरळ भ्रष्टाचार आहे.

## GOOD NEWS: आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

# दिघी–बोपखेलच्या पाणीपुरवठा सक्षमीकरणाची संकल्पपूर्ती!

## माजी नगरसेवक विकास डोळस यांनी दिली माहिती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज





**पिंपरी-चिंचवड : दिघी व बोपखेल परिसराच्या पाणीपुरवठा सक्षमीकरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अखेर पूर्णत्वास पोहोचला असून, नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीची संकल्पपूर्ती झाली आहे. आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे काम मार्गी लागल्याची माहिती माजी नगरसेवक विकास डोळस यांनी दिली.**

या प्रकल्पांतर्गत पाणी वाहतूक प्रणालीत महत्त्वाचे बदल करण्यात आले. जुन्या 400 मिमी क्षमतेच्या पाईपलाईनऐवजी भोसरी पंप हाऊस ते दिघी पाण्याच्या टाक्यांपर्यंत 600 मिमी क्षमतेची नवीन रायझिंग मेन पाईपलाईन बसवण्यात आली आहे. यामुळे पाणी वहनक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली असून भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठीही ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.

तसेच भोसरी पंप हाऊसमध्ये प्रत्येकी 250 एचपी क्षमतेच्या तीन अत्याधुनिक पंपांची स्थापना करण्यात आली आहे. वाढीव पंपिंग क्षमतेमुळे पाणीपुरवठ्याचा दाब सुधारून दिघी व बोपखेल परिसरास अधिक नियमित, सक्षम व स्थिर पाणीपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

कामाच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणी आल्या; मात्र नागरिकांच्या गरजेला प्राधान्य देत सर्व अडथळे दूर करण्यात आले, असे डोळस यांनी सांगितले. या कामामुळे परिसरातील हजारो नागरिकांना दिलासा मिळणार असून पाणीपुरवठा व्यवस्थेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्थानिक विकासकामांमध्ये सातत्य ठेवत आणखी पायाभूत सुविधा मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

> “दिघी–बोपखेलच्या पाणीपुरवठा सक्षमीकरणाची ही संकल्पपूर्ती आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शक्य झाली. प्रकल्पाच्या प्रक्रियेत अनेक अडथळे आले, परंतु दादा यांनी प्रत्येक पातळीवर हस्तक्षेप करून कामाला गती दिली. त्यांच्या पुढाकारामुळेच आज हा महत्त्वाचा टप्पा पूर्णत्वास पोहोचला असून, नागरिकांना आता स्थिर आणि सक्षम पाणीपुरवठा मिळणार आहे.”
> **– विकास डोळस,** माजी नगरसेवक.

---

## विकासाच्या अजेंड्यावर निवडणुकीला सामोरे जाणार; निशा यादव

## प्रभाग क्रमांक 11 मधून निशा दिनेश यादव यांना नागरिकांचा प्रचंड पाठिंबा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**चिखली, कृष्णानगर परिसरात भारतीय जनता पार्टीच्या निशा दिनेश यादव यांनी घर–घर संपर्क मोहीम राबवली. भाजपाच्या विकासाच्या अजेंड्यावर महापालिका निवडणुकीला सामोरे जात आहेत. प्रभागाच्या सर्वांगीण विकासातून आमदार महेश लांडगे यांच्या स्वप्नातील परिपूर्ण शहर घडवायचे आहे असे देखील निशा यादव यावेळी म्हणाल्या.**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी निशा यादव या प्रभाग क्रमांक 11 मधून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या राहण्यासाठी इच्छुक आहेत. यासाठी नागरिकांनी पर्यंत जाऊन त्यांना पक्षाची ध्येय धोरणे, विकासाचा अजेंडा त्या नागरिकांच्या समोर ठेवत आहेत. भाजपच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहराचा कायापालट झाला आहे. त्यामुळे भाजपला नागरिकांचा प्रचंड पाठिंबा मिळत असल्याचे यावेळी निशा यादव म्हणाल्या.

दरम्यान या प्रचार मोहिमेला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.घर टू घर प्रचारादरम्यान निशा यादव यांनी नागरिकांशी मनमोकळा संवाद साधत भाजपच्या विकासात्मक धोरणांची माहिती दिली. नागरिकांनीही विकासाच्या प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देत त्यांना पाठिंबा दर्शविला.

यावेळी बोलताना निशा दिनेश यादव म्हणाल्या की, “आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून विकसित होत असलेल्या शहराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. निरंतर आणि स्वच्छ पाणीपुरवठा, उच्च दर्जाचे सुरक्षित व रुंद रस्ते, नवे उपक्रम आणि सर्वांगीण विकासकामांची गती कायम ठेवून प्रभागाचा विकास सातत्याने पुढे नेणार आहोत.”

> “प्रभागातील प्रत्येक घरापर्यंत विकासाच्या योजना पोहोचवणे, नागरिकांच्या समस्या मनापासून ऐकून त्यावर उपाययोजना करणे हेच आपले ध्येय आहे. भाजपच्या विकासाच्या धोरणाला नागरिकांनी दर्शविलेला पाठिंबा हीच आपली शक्ती आहे.
> **–निशा दिनेश यादव**

## शिक्षण विश्व: पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात

# नव्या विद्यार्थ्यांचा 'दीक्षारंभ'!

### 'दीक्षारंभ' कार्यक्रमातून वैद्यकीय आणि दंत अभ्यासक्रमाच्या तुकडीचे उत्साहपूर्ण स्वागत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पिंपरी पुणे - डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे येथे वैद्यकीय पदवी (MBBS) आणि दंतशास्त्र पदवी(BDS) अभ्यासक्रमाच्या 2025–2026 च्या नव्या विद्यार्थ्यांचे 'दीक्षारंभ' स्वागत समारंभात मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित केलेल्या या भव्य समारंभाने विद्यार्थ्यांच्या महत्त्वपूर्ण शैक्षणिक प्रवासाची औपचारिक सुरुवात झाली.**




या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सर्जन व्हाइस ॲडमिरल - आरती सरीन महासंचालक - सशस्त्र दल वैद्यकीय सेवा, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणेचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, प्र कुलपती; डॉ. भाग्यश्री पी. पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, प्र कुलगुरू डॉ. स्मिता जाधव; विश्वस्त व खजिनदार, डॉ. यशराज पी. पाटील, ज्ञानप्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणेचे प्र कुलपती डॉ सोमनाथ पी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणेचे कुलसचिव डॉ. जे. एस भवाळकर, शैक्षणिक विभागाच्या संचालिका डॉ पी. वत्सलस्वामी, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, पिंपरी, पुणेच्या अधिष्ठाता, डॉ. रेखा आर्कोट, डॉ. डी. वाय. पाटील डेंटल कॉलेजचे अधिष्ठाता, डॉ. ब्रिग. एस. के. रॉय चौधरी, आदी मान्यवर उपस्थिती होते .

प्राध्यापक , प्रशासकीय अधिकारी आणि वरिष्ठ विद्यार्थी यांनी नवागत विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत केले.समारंभात संस्थेचे ध्येय, मूल्ये, शैक्षणिक अभ्यासक्रम, उपलब्ध सुविधा तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सर्वसमावेशक शैक्षणिक व्यवस्थेची माहिती देण्यात आली. यावेळी 250 MBBS आणि 100 BDS विद्यार्थ्यांचा विद्यापीठात औपचारिक प्रवेश झाला.

सर्जन व्हाइस ॲडमिरल - आरती सरीन महासंचालक - सशस्त्र दल वैद्यकीय सेवा, "आजचे वातावरण अभिमान, आशा आणि संकल्पांनी भारलेले आहे. आपण वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण करत आहात. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ हे देशातील विश्वासार्ह शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. येथे तुम्ही मानवतावादी दृष्टीकोन, नैतिक मूल्ये, शिस्त, नेतृत्व आणि आयुष्यभर शिकण्याची वृत्ती आत्मसात कराल. येथील शिक्षक केवळ ज्ञान देत नाहीत, तर सहानुभूती, नैतिकता, नेतृत्व आणि आजीवन शिक्षणाची वृत्तीही विकसित करतात. तुमची उद्दिष्टे स्पष्ट ठेवावेळेचे व्यवस्थापन करा आणि स्वतःची काळजी घेणे विसरू नका. कारण भारताला तुमच्यासारख्या जागतिक पातळीवर काम करणाऱ्या भावी डॉक्टर्सची गरज आहे."

मा. डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे यांनी संस्थेची केवळ शैक्षणिक गुणवत्ताच नव्हे, तर खरे आरोग्यसेवा नेतृत्व घडविणाऱ्या मूल्यांचे जतन करण्याची बांधिलकी अधोरेखित केली. ते म्हणाले:"आजचा दिवस आपल्या नव्या विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्रवासाची सुरुवात आहे. ते उद्देश, निष्ठा आणि उत्साहाने आरोग्यसेवेच्या विश्वात प्रवेश करत आहेत. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात आम्ही विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान व क्लिनिकल कौशल्य विकसित करत नाही, तर त्यांना खरे नेतृत्व घडवणारी मूल्येही रुजवतो. आम्हाला उत्कंठेने प्रतीक्षा आहे की हे विद्यार्थी संवेदनशील, कुशल आणि सेवाभावी आरोग्यव्यवसायिक बनतील आणि आपल्या सेवेद्वारे असंख्य लोकांच्या जीवनाला स्पर्श करतील."

डॉ. भाग्यश्री. पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ), यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले, "दीक्षारंभ हा एक पवित्र आणि महत्त्वाचा सोहळा आहे. आज तुम्ही डीपीयूच्या विद्यार्थ्यांमध्ये सामील होत या ज्ञानमंदिरात पाऊल ठेवत आहात. तुम्ही सदैव आपल्या पालकांचे ऋणी आहात—याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. ज्ञान संपादन करणे, गतिमान राहणे, श्रद्धा वाढवणे आणि आपली अंतःशक्ती बळकट करणे हेच तुमचे कर्तव्य आहे. अंतरंग शक्ती, ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती—हे तीन मंत्र तुमचे मार्गदर्शक असतील, त्यामुळे त्यांना मनाशी घट्ट जोडून ठेवा. डीपीयू येथे पारंपरिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अनोखा समन्वय असून अनुभवाधिष्ठित शिक्षण तुम्हाला मोठे स्वप्न पाहण्याची आणि तरीही नम्र राहण्याची प्रेरणा देते. सुरक्षित आणि शिस्तबद्ध कॅम्पससोबत अध्यापन व अप्रशिक्षित कर्मचारीवर्ग हे आमच्या संस्थेची मूल्यं आणि वारसा अधिक मजबूत करणारे स्तंभ आहेत. डीपीयूतील तुमचा प्रवास ज्ञान, ध्येय, प्रगती आणि करुणेने भरलेला असो—हीच शुभेच्छा."

डॉ. स्मिता जाधव, प्र-कुलगुरू - डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ), यांनी या प्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात आमचे उद्दिष्ट केवळ शैक्षणिक उत्कृष्टतेपुरते मर्यादित नाही; आम्ही प्रामाणिकपणा आणि करुणेची जपणूक करण्यावरही विश्वास ठेवतो.हीच खऱ्या नेतृत्वाची खरी ओळख आहे. विद्यार्थ्यांची बौद्धिक प्रगती, नवोन्मेषी विचारसरणी आणि करुणेने सेवा करण्याची प्रेरणा वाढीस लागेल असे शिक्षणपर वातावरण घडवण्याची आम्ही कटिबद्धता बाळगतो. आम्हाला पूर्ण विश्वास आहे की आमचे विद्यार्थी आरोग्य क्षेत्रातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जातील आणि उत्कृष्टतेची परंपरा पुढे नेत समाजावर सकारात्मक प्रभाव टाकत अनेकांचे आयुष्य घडवतील."

#### आरोग्यसेवा क्षेत्रात योगदान देण्याचा संकल्प

दीक्षारंभ कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कॅम्पसच्या विविध सुविधा दाखविण्यात आल्या आणि परस्पर संवाद वाढविणाऱ्या सत्रांचे आयोजन करण्यात आले. विविध आरोग्यविषयक शाखांमधून आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये एकोप्याची भावना निर्माण करणे, टीमवर्क, नैतिकता आणि सर्वांगीण विकास यांवर विशेष भर देण्यात आला, जेणेकरून भविष्यात ते आरोग्यसेवा क्षेत्रात अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी सक्षम होतील.

---

## गुणवत्ता महिना स्पर्धेत 360 जणांचा उत्स्फूर्त सहभाग

### शिक्षण विश्व: कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या वतीने आयोजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**गुणवत्ता स्पर्धा २०२५ द्वारे गुणवत्ता महिना साजरा करणे हे एक जबरदस्त यश होते. उत्साही सहभाग, अंतर्दृष्टीपूर्ण केस स्टडीज, सर्जनशील अभिव्यक्ती आणि मजबूत उद्योग प्रतिनिधित्व यामुळे या कार्यक्रमाने संस्कृती म्हणून गुणवत्तेचे महत्त्व अधोरेखित केले. कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया पुणे चॅप्टर ने विकसित भारताच्या दृष्टिकोनात योगदान देऊन, संस्थांमध्ये व्यवसाय उत्कृष्टता आणि टीक्यूएम पद्धतींना चालना देण्यात महत्वाची भूमिका बजावत आहे.**



क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया पुणे चॅप्टरने भोसरी येथील क्वालिटी सर्कल एक्सलन्स सेंटर येथे क्वालिटी स्पर्धा २०२५ आयोजित करून क्वालिटी महिना साजरा केला. हे सलग १२ वे वर्ष आहे, ज्यामुळे एकूण गुणवत्ता व्यवस्थापन ( टीक्यूएम) आणि उद्योगांमध्ये सतत सुधारणांना प्रोत्साहन देण्याच्या चॅप्टरच्या वचनबद्धतेला बळकटी मिळाली.,या कार्यक्रमात ४२ उद्योग संस्थांमधील ३६० जणानी सहभाग घेतला. एकूण १५१ नामांकने मिळाली. ८६ केस स्टडी, १ स्किट्स, ३८ पोस्टर्स आणि २४ स्लोगन. या स्पर्धेत संघांनी त्यांची गुणवत्ता सुधारणा यशोगाथा, स्लोगन, पोस्टर आणि स्किट सादर केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन जेबीएम ग्रुपचे सहाय्यक उपाध्यक्ष मिलिंद जठार यांनी दीपप्रज्वलन करून केले. क्यूसीएफआय चे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे आणि कौन्सिल सदस्य माधव बोरवणकर, संजीव शिंदे, अनंत क्षीरसागर, प्रकाश यार्दी हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे अभिजीत डाय अँड टूल्स ग्रुपचे सीईओ जयमुरुगन थांगवले होते. क्यूसीएफआय चे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे यांनी प्रमुख पाहुण्यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले. केस स्टडीच्या मूल्यांकनासाठी परीक्षक मनीष फाले , प्रशांत मुधलवाडकर , वेंकटेश राव, अजय अंबिके, शिरीष शहाणे, राहुल रणाळकर, विठ्ठल वाकचौरे आणि रितू मेहता होते. घोषवाक्य आणि पोस्टर मूल्यांकन, धनंजय वाघोलीकर आणि परवीन तरफदार यांनी केले. पवनकुमार रवंदळे यांनी गुणवत्तेवर प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली. परीक्षक, प्रमुख पाहुणे जयमुरुगन थांगवले आणि क्यूसीएफआय पुणे चॅप्टर कौन्सिल सदस्यांच्या हस्ते विजेत्याना सुवर्ण , रौप्य व कास्य पदक पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया रुमाले यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रशांत बोराटे, रहीम मिर्झाबेग व चंद्रशेखर रुमाले यांनी केले.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046